





सायं दैनिक

# नांदेड वार्ता

www.nandedwarta.com

•वर्ष २४ वे • अंक २४५ • शनिवार दि.२७ जून २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना क्र.जी.-२/आरएनपी/एनएनडी-२६२/२०२३-२०२५ • पाने ४ • किंमत १ रु.





मुंबई/प्रतिनिधी-शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) २०२६ च्या पूर्वसंध्येलाच प्रश्नपत्रिका फुटल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आल्याने २८ जून रोजी होणारी टीईटी परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे राज्यभरातील सुमारे ६ लाख १२६ उमेदवारांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले असून, नव्या तारखेची घोषणा पुढील दोन ते तीन दिवसांत करण्यात येणार असल्याची माहिती परिषदेच्या उपायुक्त प्रिया शिंदे यांनी दिली.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत घेण्यात येणारी शिक्षक पात्रता परीक्षा ही राज्यातील शिक्षक भरती प्रक्रियेतील अत्यंत महत्त्वाची परीक्षा मानली जाते. भिवंडीतील कोनगाव परिसरातून टीईटी प्रश्नपत्रिका फुटल्याचे उघड झाल्यानंतर पोलिसांनी तातडीने कारवाई करत तीन संशयितांना सहारा विमानतळ परिसरातून अटक करण्यात आली. त्यांच्या ताब्यातून टीईटी प्रश्नपत्रिकेतील प्रश्न आढळून आल्याने कोनगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने २८ जून रोजी राज्यातील ३७ शहरांतील १,०२८ परीक्षा केंद्रांवर टीईटी परीक्षा घेण्याचे नियोजन करण्यात आले होते.

## दिल्ली-हरियाणा कनेक्शन उघड!

# टीईटी पेपरफुटीचा दीड कोटींचा सौदा

ठाणे:राज्यातील शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) पेपरफुटी प्रकरणात धक्कादायक माहिती समोर आली असून या रॅकेटचे धागेदोरे थेट दिल्ली, हरियाणा आणि बिहारपर्यंत पोहोचल्याचे तपासातून स्पष्ट झाले आहे. भिवंडी पोलिसांनी विमानतळ परिसरातून तिघा आरोपींना अटक केली आहे. या पेपरचा व्यवहार तब्बल दीड कोटी रुपयांत ठरल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

अपर पोलीस आयुक्त अशोक दुधे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये बिहारमधील राजीव शाह (४५) व आकाश कुमार (३०), तसेच हरियाणातील धीरज कुमार (२८) यांचा समावेश आहे. या प्रकरणातील मुख्य सूत्रधार अद्याप फरार असून त्याचा शोध सुरू आहे.पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे सापळा रचण्यात आला होता. आरोपी दिल्लीहून टीईटीचा प्रश्नपत्रिका संच विक्रीसाठी भिवंडीत आले होते. झडतीदरम्यान त्यांच्या ताब्यातून प्रश्नपत्रिकेचे चार संच, मोबाईल फोन आणि डेबिट कार्ड जप्त करण्यात आले आहेत.या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जप्त करण्यात आलेल्या प्रश्नपत्रिका टीईटी परीक्षेच्याच मूळ प्रश्नपत्रिका असल्याचे तपासात निष्पन्न झाल्याची माहिती पोलिसांनी दिली.प्राथमिक तपासानुसार आरोपी हे प्रश्नपत्रिका इच्छुक उमेदवारांना विकण्यासाठी आले होते. त्यानंतर त्या पुढे विविध रकमा घेऊन इतरांना विकल्या जाणार होत्या, अशी माहितीही समोर आली आहे. या संपूर्ण प्रकरणाचा तपास डीसीपी पवन बनसोडे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे. आरोपींना प्रश्नपत्रिका नेमकी कुठून मिळाली, याचा शोध घेतला जात आहे. यासोबतच विविध कोचिंग क्लासेस आणि संबंधित व्यक्तींचीही चौकशी केली जाणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले.प्राथमिक तपासात शिक्षण विभागातील कोणत्याही अधिकाऱ्याचा थेट सहभाग आढळून आलेला नसल्याचे पोलिसांनी सांगितले. मात्र, अटक करण्यात आलेल्या आरोपींपैकी एकाने केंद्रीय विद्यालयात नोकरी मिळवून देण्याच्या नावाखाली पैसे दिल्याची माहिती समोर आली असून दुसरा आरोपी पूर्वी टीईटी परीक्षा देऊन नापास झाला होता. या पार्श्वभूमीवर संपूर्ण रॅकेटचा सखोल तपास सुरू असून आणखी धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

# टीईटीचा पेपर फुटल्याने विद्यार्थ्यांमध्ये तीव्र संताप

नांदेड/प्रतिनिधी-महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्यावतीने रविवार दि.२८ जून रोजी घेण्यात येणाऱ्या शिक्षक पात्र परीक्षा (टीईटी) परीक्षेचा पेपर आज (शनिवार) सकाळी फुटल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. पेपर फुटल्याने उद्या होणारी टीईटीची परीक्षा रद्द करण्यात आल्याने विद्यार्थ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

शिक्षक पात्र परीक्षा (टीईटी) रविवार दि.२८ जून रोजी नांदेड जिल्ह्यातील ५४ परीक्षा केंद्रांवर घेण्यात येणार होती. प्रशासनाकडून परीक्षे संदर्भात जवळपास सर्व तयारी पूर्ण करण्यात आली होती. ५४ परीक्षा केंद्रांवर एकूण ३० हजार परीक्षार्थी परीक्षा देणार होते. यामध्ये प्राथमिक गटासाठी १३ हजार १०५ तर उच्च माध्यमिक गटासाठी १६ हजार ९७१ विद्यार्थ्यांचा समावेश होता. राज्य सरकारने खाजगी व जिल्हा परिषद शाळेत कार्यरत असलेल्या शिक्षकांनाही टीईटी परीक्षा अनिवार्य केली आहे. ज्या शिक्षकांना सेवानिवृत्तीसाठी दोन ते तीन वर्षाचा कार्यकाळ बाकी आहे अशा शिक्षकांना टीईटी परीक्षेतून शासनाने सुट दिली. गेल्या अनेक दिवसांपासून टीईटीच्या परीक्षेची विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी अभ्यास करुन परीक्षा देण्याची तयारी केली आहे. परीक्षेच्या एक दिवस अगोदर म्हणजेच आज (शनिवार) दि.२७ जून रोजी सकाळी ठाणे जिल्ह्यातील भिवंडी येथे टीईटी परीक्षेचा पेपर फोडण्यात आला. पोलीसांनी संशयीताकडून प्रश्नपत्रीका जप्त केल्यानंतर महाराष्ट्र राज्य शिक्षक परीषदेने टीईटी परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला आहे. टीईटी पेपर फुटीच्या घटनेमुळे विद्यार्थ्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला. विद्यार्थ्यांनी अनेक दिवसांपासून परीक्षेची तयारी केली होती. सरकारच्या नियोजनशून्य कारभारामुळे याचा फटका विद्यार्थ्यांना बसला आहे. यापूर्वी नीटचा पेपर फुटल्याची घटना घडली होती. टीईटी परीक्षेसाठी सरकारने कडक पाऊले उचलून उपाययोजना करणे आवश्यक होते. सरकार व प्रशासनाच्या ढिसाळ कारभाराचा फटका विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी बसला आहे.



टीईटी पेपरफुटी प्रकरणी नांदेडमध्ये काँग्रेसच्यावतीने बोंबाबोंब आंदोलन करण्यात आले. यावेळी प्रदेश सरचिटणीस सुरेंद्र घोडजकर, डॉ.श्रावण रॅपनवाड, जिल्हाध्यक्ष विठ्ठल पावडे, अब्दुल गफुर, मुन्ना अब्बास हुसेन, सुरेश हटकर यांच्यासह काँग्रेस पदाधिकाऱ्यांसह अनेकजण सहभागी झाले होते. (छाया : करणसिंह बैस)

# नांदेड जिल्ह्यातील ई-पॉस मशीन्स पुन्हा सुरु

नांदेड/प्रतिनिधी-जिल्ह्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत तांत्रिक कारणांमुळे बंद पडलेल्या ई-पॉस मशीन्स शासनाकडून मंजुरी मिळाल्यानंतर पुन्हा पूर्ववत सुरू करण्यात आल्या आहेत. नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी आणि पात्र लाभार्थ्यांना त्यांचे हक्काचे धान्य मिळावे यासाठी प्रशासनाच्या मागणीनुसार शासनाने आता ३० जून २०२६ पर्यंत मुदतवाढ दिली असल्याची माहिती जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी दिली आहे.

शासकीय नियमांनुसार, एप्रिल ते जून या तीन महिन्यांच्या कालावधीचा धान्य साठा वितरित करण्याचे आदेश होते. यासाठी १५ जून २०२६ ही अंतिम मुदत निश्चित करण्यात आली होती. मात्र, काही रास्त भाव दुकानांमधून वेळेत धान्याची उचल न होऊ शकल्यामुळे सॉफ्टवेअरच्या स्वयंचलित नियमानुसार जिल्ह्यातील सुमारे २ हजार ई-पॉस मशीन्स १५ जून रोजी लॉक झाल्या होत्या. यामुळे बायोमेट्रिक (अंगठ्याची) पडताळणी बंद होऊन धान्य वितरण तात्पुरते ठप्प झाले होते.या समस्येमुळे शिधापत्रिकाधारक आणि रास्त भाव दुकानदार दोघांनाही अडचणींचा सामना करावा लागत होता. ही गंभीर बाब लक्षात घेऊन जिल्हा पुरवठा विभागाने तातडीने वरिष्ठ पातळीवर आणि शासनाकडे मुदतवाढीसाठी पाठपुरावा केला होता. नागरिकांचे हित लक्षात घेऊन शासनाने या मागणीला सकारात्मक प्रतिसाद दिला असून, वितरणासाठी ३० जून २०२६ पर्यंत अधिकृत मुदतवाढ मंजूर केली आहे. शासनाकडून मुदतवाढ मिळाली असुन, जिल्ह्यातील ई-पॉस मशीन्स अनलॉक (सुरू) झाल्या आहेत. ३० जूनच्या वाढीव मुदतीत सर्व पात्र लाभार्थ्यांना धान्य वितरण सुरळीतपणे चालु आहे.

# वर्षभरापासून उद्घाटनाच्या प्रतीक्षेत कुंडलवाडीचे नवे बसस्थानक

कुंडलवाडी/प्रतिनिधी-कुंडलवाडी शहरात लाखो रुपये खर्च करून उभारण्यात आलेल्या नव्या बसस्थानकाचे बांधकाम पूर्ण होऊन जवळपास वर्षभराचा कालावधी लोटला आहे. मात्र अद्याप उद्घाटन न झाल्याने ही आधुनिक इमारत वापराविना पडून असून प्रवाशांसह नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. संबंधित विभागाने विलंब न करता बसस्थानक प्रवाशांच्या सेवेत दाखल करावे, अशी जोरदार मागणी होत आहे.

सध्या पावसाळ्यामुळे बसची प्रतीक्षा करणाऱ्या प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे. पुरेशा निवाऱ्याअभावी नागरिकांना उन्हात व पावसात उभे राहावे लागत असून महिला, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी आणि दिव्यांग प्रवाशांना विशेष त्रास सहन करावा लागत आहे. नवीन बसस्थानक सुरू झाल्यास प्रवाशांना सुरक्षित, सुसज्ज व सर्व सुविधा असलेले




प्रतीक्षास्थळ उपलब्ध होणार असून शहरातील वाहतूक व्यवस्थेलाही शिस्त लागण्यास मदत होईल. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, बसस्थानकाचे बांधकाम पूर्ण झाले असून आवश्यक पायाभूत सुविधाही उपलब्ध आहेत. तरीही प्रशासकीय कारणांमुळे उद्घाटन रखडल्याची चर्चा आहे. यामुळे नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले असून सार्वजनिक निधीतून ***पान ४ वर***

# केवळ नवीन कठडे लावून प्रवाशांना 'लॉलीपॉप';पावसाळ्यात मोठ्या दुर्घटनेची भीती



माहूर/प्रतिनिधी-नांदेड-यवतमाळ सीमा रेषेवरील पैनगंगा नदीवरील धानोडा येथील जुना पूल सध्या अत्यंत धोकादायक अवस्थेत असून, त्यावरून सुरू असलेली वाहतूक प्रवाशांच्या जीवाशी खेळ करणारी ठरत आहे. पुलाची कालमर्यादा संपलेली असून तो मोठ-मोठ्या खड्ड्यांनी पोखरला आहे. विशेष म्हणजे नवीन पूल पूर्णपणे तयार होऊन जवळपास दोन वर्ष उलटले असतानाही तो अद्याप वाहतुकीसाठी खुला करण्यात आलेला नाही.

गतवर्षी पुरामुळे जुन्या पुलावरील संरक्षण कठडे वाहून गेले होते. काही महिन्यांपूर्वी संबंधित विभागाने केवळ नवीन कठडे बसवून त्याच जीर्ण पुलावरून वाहतूक सुरू केली. मात्र, पावसाळा सुरू होऊनही नवीन पूल सुरू करण्याबाबत कोणतीही हालचाल दिसत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. नवीन पूल सुरू न होण्यामागे दोन्ही बाजूंना मुरूम भरण्याचे कारण सांगितले जात असले, तरी हे काम अनेक दिवसांपासून संथ गतीने सुरू असून सध्या जवळपास ठप्प असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे प्रशासन आणि कंत्राटदाराच्या हलगर्जीपणाचा फटका थेट वाहनचालक व प्रवाशांना बसत आहे. सुमारे १५० ते २०० मीटरपर्यंतचा जुना पूल पूर्णपणे खड्डेमय झाला असून त्यावरून दररोज जड वाहने, एसटी बसेस, चारचाकी आणि दुचाकींची मोठ्या प्रमाणावर ये-जा सुरू असते. त्यामुळे प्रत्येक प्रवास धोकादायक ठरत आहे. पावसाच्या पाण्यामुळे पुलाची आणखी पडझड होऊन मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तीर्थक्षेत्र माहूरकडे येणारे भाविक, स्थानिक नागरिक आणि वाहन चालकांनी प्रशासनासह लोक-प्रतिनिधींवरही नाराजी व्यक्त केली आहे. तयार पूल असूनही तो सुरू का केला जात नाही? एखाद्या मोठ्या दुर्घटनेची वाट पाहत आहात का? असा सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे. तसेच, खासदार आणि आमदारांनी तातडीने लक्ष घालून धानोड्याचा नवीन पूल वाहतुकीसाठी खुला करावा, अशी जोरदार मागणी प्रवासी व नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# गद्दार जिथे दिसतील तिथे जाब विचारा

## उद्धव ठाकरेंचा शिवसैनिकांना आदेश

यवतमाळ:शिवसैनिकांना गद्दार खासदार जिथे सापडतील तिथे त्यांना जाब विचारा, असा थेट आदेश शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज यवतमाळ येथे झालेल्या जाहीर सभेत शिवसैनिकांना दिला.

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षातील सहा खासदारांनी एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश केल्यानंतर राज्यातील राजकीय वातावरण अधिकच तापले आहे. पक्ष सोडून गेलेल्या खासदारांच्या मतदारसंघांचा दौरा सुरू असताना यवतमाळ येथील जाहीर सभेत शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी बंडखोर खासदारांवर जोरदार हल्लाबोल केला. यावेळी बोलताना उद्धव ठाकरे यांनी यवतमाळचे खा.संजय देशमुख यांचा नाव न घेता समाचार घेतला. दोन आठवड्यांपूर्वी खासदारांची बैठक झाली होती. त्यावेळी त्यांनी मुलीची सोयरिक जुळवायची असल्याचे सांगितले होते.

# प्रभू रामचंद्र सुरक्षित नसतील तर सर्वसामान्यांचे काय?

अयोध्या आणि प्रभू श्रीरामचंद्र हे केवळ धार्मिक आस्थेचे केंद्र नसून करोडो भारतीयांच्या अस्मितेचा आणि अखंड श्रद्धेचा विषय आहेत. ज्या मंदिराच्या उभारणीसाठी पिढ्यानपिढ्या संघर्ष झाला, नव्वदच्या दशकात भारतीय जनता पक्षाने ज्या मुद्द्याला राजकारणाच्या केंद्रस्थानी आणून दोन वेळा निवडणुका जिंकल्या आणि ज्यासाठी हजारो रामभक्तांनी आपल्या प्राणांची आहुती दिली, ते राम मंदिर आज एका वेगळ्याच अत्यंत गंभीर वादळात सापडले आहे. राम मंदिराच्या दानपेटीत जमा झालेल्या कोट्यवधी रुपयांच्या निधीमध्ये मोठा गैरव्यवहार झाल्याचे प्रकरण उघडकीस आल्यानंतर, उत्तर प्रदेश सरकारने नेमलेल्या विशेष तपास पथकाने आठ जणांना ताब्यात घेतले. या पाठोपाठ, या संपूर्ण प्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारत राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टचे सरचिटणीस चंपत राय आणि विश्वस्त डॉ. अनिल मिश्रा यांनी तडकाफडकी दिलेले राजीनामे ही भारतीय राजकारणाला आणि समाजकारणाला मोठी गदा देणारी घटना ठरली आहे. या घडामोडींनी संपूर्ण देशातील रामभक्तांना धक्का तर दिलाच आहे, पण त्यासोबतच एक अत्यंत अस्वस्थ करणारा प्रश्न उपस्थित केला आहे. जर स्वतः प्रभू रामचंद्रांच्या दरबारात दरोडेखोर डल्ला मारत असतील आणि तिथली व्यवस्था सुरक्षित नसेल, तर या देशातील सर्वसामान्यांचे काय? २०१४ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीतही राम जन्मभूमीचा मुद्दा भाजपच्या प्रचारामध्ये अग्रस्थानी होता. तीन वेळा सत्ता उपभोगूनही राम मंदिर होत नसल्याने हिंदू मतदारांमध्ये प्रचंड नाराजी निर्माण झाली होती. अखेर २०१९ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणी ऐतिहासिक न्याय निवाडा दिला. या निर्णयानंतर निकाल देणाऱ्या खंडपीठातील न्यायाधीशांना राज्यसभेवर घेण्यात आले, ज्यावरून देशात मोठी राजकीय चर्चा रंगली होती. न्यायालयीन निकालानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राम मंदिर निर्माणसाठी प्रचंड मेहनत घेतली. अनेक राम भक्तांनी या पवित्र कार्यासाठी आपल्या घामाचा पैसा आणि भरभरून आर्थिक मदत केली. आज जगातील सगळ्यात सुंदर राम मंदिर असल्याचा दावा भारतीय जनता पक्षाकडून वारंवार केला जातो, परंतु या जगातील सर्वात सुंदर असलेल्या राम मंदिराची सुरक्षा आणि व्यवस्था मात्र सध्या 'रामभरोसे' असल्याचेच या धक्कादायक प्रकरणावरून उघड झाले आहे. ट्रस्टचे महत्त्वाचे खांदे मानल्या गेलेल्या चंपत राय आणि अनिल मिश्रा यांच्या राजीनाम्यामुळे आता राजकारणातील 'खोली' किती वाढणार आणि याचे आगामी काळातील निवडणुकांवर काय परिणाम होणार, याकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे. ज्या राम मंदिराच्या बळावर भाजपने देशाच्या राजकारणाची दिशा बदलली, त्याच मंदिराच्या अंतर्गत कारभारातील हा भ्रष्टाचार आता विरोधकांच्या हाती मोठे कोलीत देऊन गेला आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि विश्व हिंदू परिषद यांच्या अत्यंत जवळचे आणि राम मंदिर आंदोलनाचा प्रदीर्घ इतिहास असलेले चंपत राय यांचे पायउतार होणे, हे सत्ताधारी पक्षासाठी नैतिक आणि राजकीय दृष्ट्या अत्यंत अडचणीचे ठरणारे आहे. हिंदुत्वाच्या राजकारणाची मुख्य शिळा असलेल्या या पवित्र वास्तूमध्येच जर आर्थिक लुटालूट होत असेल, तर विरोधकांना सत्तेवर नैतिकतेचे प्रश्न उपस्थित करण्याची आयती संधी मिळाली आहे. हे राजीनामे केवळ कायदेशीर चौकशीचा भाग आहेत की, यामागे भाजप आणि त्यांच्या मातृसंघटनांमधील अंतर्गत नाराजी आणि राजकीय दबाव आहे, ही राजकारणातील 'खोली' आगामी काळात अधिक स्पष्ट होईल.२०१४ मध्ये पहिल्यांदा पंतप्रधान झालेल्या मोदींनी स्वतःला 'देश का चौकीदार' म्हणून संबोधले होते. यादरम्यान निरव मोदी, विजय मल्ल्या यासारखे मोठे भांडवलदार बँकातून अब्जावधी रुपये घेऊन परदेशात पळून गेले आणि 'चौकीदार' काहीच करू शकला नाही, अशी टीका सातत्याने झाली. आता तर स्वतः प्रभू रामचंद्रांच्या दरबारी दरोडेखोरांनी मोठा डल्ला मारला आहे. ज्या ईश्वराच्या नावाने देशात मोठी राजकीय सत्तास्थाने काबीज केली गेली, त्या ईश्वराच्या चरणी अर्पण केलेले पवित्र धन जर सुरक्षित नसेल, तर देशातील एका सामान्य नागरिकाने स्वतःच्या मालमत्तेच्या, हक्कांच्या आणि सुरक्षिततेच्या अपेक्षेसाठी कोणाकडे पाहावे? केवळ मंदिराच्या भव्यतेचा आणि सौंदर्याचा डांगोरा पिटून सरकारला आणि प्रशासनाला आपली जबाबदारी झटकता येणार नाही. मंदिराचे पावित्र्य, तिथली पारदर्शकता आणि सुरक्षा राखणे हे देखील तितकेच मोठे कर्तव्य आहे. एसआयटीने आणखी काही मोहरे हाती लागण्याची शक्यता वर्तवली आहे. त्यामुळे या घोटाळ्याचे धागेदोरे किती खोलवर गेले आहेत, हे उघड होणे गरजेचे आहे. उत्तर प्रदेश सरकारने या प्रकरणाच्या मुळाशी जाऊन गुन्हेगारांना कठोर शिक्षा दिली पाहिजे. राम मंदिराचे राजकारण करणाऱ्यांनी आता आत्मपरीक्षण करून या व्यवस्थेचे शुद्धीकरण करण्याची वेळ आली आहे, अन्यथा ''प्रभू रामचंद्र सुरक्षित नसतील तर सर्वसामान्यांचे काय?'' हा जनतेच्या मनातील प्रश्न सत्ताधाऱ्यांना आगामी काळात राजकीय दृष्ट्या प्रचंड महाग पडू शकतो.

# शिक्षणक्षेत्रातील मानबिंदू: नांदेड एज्युकेशन सोसायटी







पूज्य स्वामी रामानंद तीर्थ यांनी नांदेड एज्युकेशन सोसायटी संचालित पीपल्स कॉलेजची स्थापना २६ जून १९५० रोजी केली. पीपल्स कॉलेजचा ७६ वा वर्धापन दिन दि. २६ जून रोजी संपन्न झाला. पूज्य स्वामी रामानंद तीर्थ यांनी लावलेल्या रोपट्याचे आज वटवृक्षात रूपांतर झालेले आहे. आज नांदेड एज्युकेशन सोसायटीचे तीन यूनिट आहेत. ते म्हणजे पीपल्स कॉलेज, सायन्स कॉलेज आणि पीपल्स हायस्कूल होय. नांदेड एज्युकेशन सोसायटी नांदेडचा लौकिक केवळ मराठवाडा, महाराष्ट्रातच नव्हे तर देशपाळीवर निर्माण झालेला आहे. याचे सर्व श्रेय पू.स्वामीजी, गोविंदभाई श्राफ, सदाशिवराव पाटील साहेब डॉ.व्यंकटेश काब्दे, आणि नंतरचे सर्व नेतृत्व यांना जाते.आजपर्यंत नांदेड एज्युकेशन सोसायटी वाटचाल ही स्वामीजींच्या शैक्षणिक धोरणानुसार चालू आहे. स्वामीजींची नांदेड एज्युकेशन सोसायटीचा विकास लोकाश्रयाने व्हावा अशी स्वामीजींची धारणा होती. यानुसार नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या स्थापनेपासून संस्थेचा लोकाश्रय हाच आधार आहे.

आज पीपल्स कॉलेजचा विस्तार वाढलेला आहे. पीपल्स कॉलेजमध्ये सध्या कला व वाणिज्य विद्याशाखेतील पदवी शिक्षणाबरोबरच पदव्युत्तर पातळीवरील इंग्रजी, हिंदी, मराठी, वाणिज्य व राज्यशास्त्र हे अनुदानित तत्त्वावरील अभ्यासक्रम १९६३ पासून शिकवले जातात, तर समाजशास्त्र व अर्थशास्त्र या विषयात विनाअनुदानित तत्त्वावर पदव्युत्तर शिक्षणाची सोय आहे. २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून महाविद्यालयात लोकप्रशासन व इतिहास विषयात पदव्युत्तर शिक्षणाची सोय झाली आहे. महाविद्यालयात मराठी, हिंदी, इंग्रजी, राज्यशास्त्र, इतिहास, अर्थशास्त्र व वाणिज्य या विषयात पीएच.डी. पदवीसाठी विद्यापीठ मान्यताप्राप्त संशोधन केंद्र चालू आहे. महाविद्यालयांमध्ये अभ्यासेतर उपक्रमांमध्ये क्रीडा विभाग हा अतिशय संपन्न विभाग आहे. पीपल्स महाविद्यालयात हुतात्मा गोविंद पानसरे यांच्या नावाने मध्यवर्ती ग्रंथालय असून त्यात जवळपास एक लाख २० हजार पुस्तके व संदर्भग्रंथ, ई-बुक्स, उपलब्ध असून ८००० मागील नियतकालिकाचे खंड उपलब्ध आहेत. याशिवाय डॉ.बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिका व पदव्युत्तर विभागात विभागीय ग्रंथालया असून विद्यार्थ्यांना आवश्यक असलेली क्रमिक पुस्तके उपलब्ध करून दिली जातात. प्रा. संदीप गायकवाड हे उपक्रमशील ग्रंथपाल म्हणून कार्यरत आहेत.

पीपल्स महाविद्यालयांमध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभाग, राष्ट्रीय छात्र सेना विभाग व स्पर्धापरीक्षा केंद्र विभाग आहे कार्यरत आहे. या विभागाच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. मविद्यालयात या विविध विभागांमधून अनेक अनेक विद्यार्थी शासकीय नोकरिकरिता पात्र होतात. त्याचबरोबर वेगवेगळ्या विभागाच्यावतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. महाविद्यालयात दिनविशेष समिती आहे या समितीच्या वतीने विविध महापुरुषांची जयंती किंवा पुण्यतिथीनिमित्त त्याच दिवशी महाविद्यालयात कार्यक्रम घेतले जातात. याचबरोबर कनिष्ठ महाविद्यालय, किमान कौशल्य विभाग इत्यादीमध्ये विद्यार्थी शिक्षण घेताहेत महाविद्यालयात प्रवेश घेताना विद्यार्थ्यांमध्ये कोणता हे भेदभाव केला जात नाही, उलट प्रसंगी गरीब विद्यार्थ्यांना काही प्राध्यापक सामाजिक जाणिवेतून आर्थिक मदत करतात. नामवंत प्राध्यापकांची परंपरा महाविद्यालयात आजही कायम आहे.

नांदेड एज्युकेशन सोसायटीचे दुसरे महाविद्यालय सायन्स कॉलेज नांदेड हे मागील ६५ वर्षापासून शैक्षणिक क्षेत्रात प्रगतीपथावर कार्यरत आहे. सन २०१७ मध्ये एचआरडी मिनिस्ट्रीने प्रसिद्ध केलेल्या एनआयआरएफ रँकिंग मध्ये नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या सायन्स कॉलेजला राष्ट्रीय स्तरावर ७२ वे नामांकन प्राप्त झालेले आहे. या महाविद्यालयाने तिसऱ्या वेळेस नॅक बेंगलोर कडून ए ग्रेड प्राप्त केलेला आहे. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने सायन्स महाविद्यालयाला बेस्ट कॉलेजचा पुरस्कार देऊन कॉलेजचा सन्मान केला आहे. यूजीसी ने सायन्स कॉलेजला कॉलेज विथ पोटेन्शिअल फॉर एक्सलन्स (सीपीई) चा दर्जा दिलेला आहे. या अंतर्गत आलेले अनुदान सायन्स कॉलेजची उभारणी व विकासासाठी वापरण्यात आलेले आहे. सुसज्ज प्रयोगशाळा, अद्यावत सेंट्रल इन्स्ट्रुमेंशन लॅब इत्यादी सुविधा संशोधक विद्यार्थ्यांना सायन्स महाविद्यालयात उपलब्ध झालेल्या आहेत. अन्वेषण व अविष्कार सारखे संशोधनाला चालना देणारे रिसर्च फेस्टिवल या महाविद्यालयाने यशस्वीरित्या आयोजित केले आहेत. कॉलेजचे प्राध्यापक आयसीटी मॉडेल, सॉफ्टवेअर व विविध वेबसाईटचा वापर करून अध्ययन अध्यापनाचे कार्य करत आहेत.

सायन्स महाविद्यालयामध्ये अद्ययावत सदाशिवराव पाटील क्रीडासंकुल उभारले आहे. या क्रीडा संकुलामध्ये विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी जवळपास ४०० मीटर रनिंग ट्रॅक, राष्ट्रीय दर्जाचा इंडोर हॉल,क्रिकेट, हॉलीबॉल, बास्केटबॉल, फुटबॉल ग्राउंड,लॉन टेनिस कोर्ट, जिम्नॅशियम इत्यादी अत्याधुनिक सुविधा उपलब्ध आहेत. कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी जलतरण, अथलेटिक्स, तायक्वांदो, वेटलिफ्टिंग इत्यादी वैयक्तिक क्रीडा प्रकारांमध्ये सुवर्णपदक व विविध कांस्यपदक पटकावलेले आहेत.पूज्य स्वामी रामानंद तीर्थ यांनी नांदेड एज्युकेशन सोसायटी संचालित पीपल्स हायस्कूलची स्थापना १९५३ मध्ये केली. मराठवाड्या सारख्या मागास भागातील विद्यार्थ्यांना लहानपणी शिक्षण मिळावे यासाठी सुरुवातीला पाचवी ते दहावी असे वर्ग चालू केले. सध्या पीपल्स हायस्कूल नांदेड गोकुळ नगर परिसरामध्ये चालू आहे. पीपल्स हायस्कूलमध्ये जवळ पास २०१६ पासून पहिली ते चौथीचे वर्ग चालू करण्यात आलेले आहेत. पीपल्स हायस्कूलच्या स्थापनेपासून पाचवी ते दहावी असे वर्ग चालू आहेत. पीपल्स हायस्कूलमध्ये विद्यार्थ्यांना संस्काराचे शिक्षण दिले जाते. त्याचबरोबर सामाजिक जाणीव जागृत करण्याचा प्रयत्न केला जातो. वेगवेगळे सामाजिक व शैकक्षणिक उपक्रम घेऊन, त्याच बरोबर विविध क्रीडा उपक्रमाचे प्रशिक्षण देऊन विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न केला जातो.पीपल्स कॉलेजच्या परिसरामध्ये नांदेड एजुकेशन सोसायटी आणि नरहर कुरूंदकर प्रतिष्ठान यांचा संयुक्त उपक्रम नरहर कुरूंदकर प्रगत अध्ययन व संशोधन केंद्र कार्यरत आहे. या केंद्राच्या वतीने विविध व्याख्यान व कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.

नांदेड एजुकेशन सोसायटीच्या सर्व महाविद्यालयांमध्ये सर्व जाती-धर्माची मुले शिक्षण घेत आहेत याचबरोबर समाजातील तळागाळातील विद्यार्थी एकत्रित बरोबरीने शिक्षण घेत आहेत. महाविद्यालयात विद्यार्थी केंद्रित नियोजन राबवले जाते. पीपल्स कॉलेज संबंधी बोलताना नांदेड एज्युकेशन सोसायटीचे तत्कालीन अध्यक्ष पद्मविभूषण गोविंदभाई श्रॉफ म्हणाले होते की, पीपल्स कॉलेज मध्ये समाजातील तळागाळातील विद्यार्थी शिक्षण घेत आहेत खऱ्या अर्थाने हेच विद्यार्थी या कॉलेजचे भूषण आहेत. आज नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सीए डॉ.प्रवीण पाटील, उपाध्यक्ष श्री प्रफुल्ल अग्रवाल,सचिव सौ.श्यामलताई पत्की कुंदकर, सहसचिव श्री. प्रदीप नागापूरकर. कार्यकारिणी सदस्य डॉ. व्यंकटेश काब्दे ,नौनीहालसिंघ जहागीरदार, अड. सी. बी. दागडीया, अड. , डॉ. उमेश भालेराव, कु. शांभवी साले, प्रा.डॉ. ए. टी. शिंदे, प्रा. डॉ. यशपाल भिंगे, प्रा. विलास वडजे, श्री. ई. एम. खिल्लारे, श्री राहुल गोरे, प्राचार्य डॉ. लक्ष्मण शिंदे , मुख्याध्यापक श्री. प्रशांत चौधरी या सर्व कार्यकारिणी मंडळाच्या नेतृत्वात नांदेड एज्युकेशन सोसायटीची वाटचाल चालू आहे.

नांदेड एजुकेशन सोसायटीच्या या यशस्वी वाटचालीत अनेक आव्हानांना समोर जावे लागत आहे. महाविद्यालयाचा लोकाश्रय टिकवणे, महाविद्यालयाची समाजाभिमुखता व लोककल्याणाची प्रेरणा कायम ठेवणे,धर्मनिरपेक्ष विचारांची पाठराखण करणे, व्यवस्थापनातील लोकशाही कार्यप्रणाली अबाधित ठेवणे, समाजाचे बौद्धिक व शैक्षणिक नेतृत्व करणे, कार्यसंस्कृती मध्ये आलेली मरगळ दूर करणे, निर्णय प्रक्रियेत वस्तुनिष्ठता, गुणवत्ता, पारदर्शकता व विश्वासार्हता आणून अशा प्रकारचे कार्य करणाऱ्या प्राध्यापक व कर्मचाऱ्यांचे मनोधैर्य टिकवून ठेवणे व त्यांना पुन्हा चांगल्या कामासाठी प्रोत्साहन देणे, वर्गात विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढवणे इत्यादी कार्य विचारपूर्वक करावी लागतील. आजचे युग हे डिझिटल आहे.या डिझिटलयुगामध्ये सर्व शैक्षणिक साधने आधुनिक स्वरूपामध्ये असायला हवी, यासाठी नांदेड एजुकेशन सोसायटीच्या महाविद्यालयांमध्ये भविष्यात विविध स्वरूपाच्या मूलभूत सुविधा निर्माण होण्याचे प्रयोजन आहे, पीपल्स महाविद्यालयांला आणि ग्रंथालयास प्रशस्त इमारत हवी त्या दृष्टीनेही प्रयत्न चालू आहेत. कनिष्ठ महाविद्यालय व पदव्यूत्तर विभागासाठी स्वतंत्र इमारत निर्माण करण्याचे प्रयोजन आहे. आशाप्रकारे नांदेड एजुकेशन सोसायटी संचलीत दोन्ही महाविद्यालयाच्या वाटचालीत अनेक आव्हाने निर्माण होत असली तरी नांदेड एज्युकेशन सोसायटीचे सर्व पदाधिकारी, महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक व विद्यार्थी या सर्व आव्हानांवर मात करून स्वामीजींच्या शैक्षणिक विचारांचा वारसा अधिक प्रकाशमान करतील.

डॉ.विकास सुकाळे
प्राचार्य,पीपल्स कॉलेज,नांदेड.

# सायन्स कॉलेजमध्ये इनोव्हेशन,इन्क्युबेशन अँड स्टार्टअप सेलचे उद्घाटन

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या सायन्स कॉलेज, नांदेड येथे इनोव्हेशन, इन्क्युबेशन अँड स्टार्टअप सेलचे उद्घाटन आज उत्साहपूर्ण वातावरणात मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये नवकल्पना, संशोधन, उद्योजकता, स्टार्टअप संस्कृती, उद्योगशैक्षणिक सहकार्य आणि कौशल्य विकासाला नवी दिशा मिळणार असल्याचे यावेळी मान्यवरांनी सांगितले.

या सेलचे उद्घाटन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू प्रा. डॉ. अशोक महाजन यांच्या हस्ते झाले. यावेळी नांदेड एज्युकेशन सोसायटीचे माजी अध्यक्ष डॉ. व्यंकटेश काब्दे, अध्यक्ष सी.ए. डॉ. प्रवीण पाटील, उपाध्यक्ष प्रफुल्ल अग्रवाल, सचिव सौ. श्यामल पत्की, सहसचिव प्रदीप नागापूरकर, कार्यकारिणी सदस्य दीपनाथ पत्की, मा.प्रा.डॉ.ए.टी. शिंदे यांच्यासह संस्थेचे सर्व कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एल. पी.शिंदे, उपप्राचार्य सौ.अरुणा शुक्ला, एकनाथ खिल्लारे, माजी प्राचार्य डॉ.डी.यू.गवई, प्रा.ए.के. घाडगे, प्रा.नरवाडे, प्राध्यापकवृंद, कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना मान्यवरांनी विद्यार्थ्यांनी केवळ नोकरीच्या संधींकडे न पाहता नवकल्पना आणि संशोधनाच्या माध्यमातून उद्योजक बनण्याचा प्रयत्न करावा, असे आवाहन केले. विद्यार्थ्यांच्या अभिनव कल्पनांना उद्योगरूप देण्यासाठी, स्टार्टअप उभारणीसाठी आवश्यक मार्गदर्शन, तांत्रिक सहाय्य आणि उद्योग क्षेत्राशी संपर्क उपलब्ध करून देण्यात या



सेलची महत्त्वाची भूमिका राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या इन्नोव्हेशन, इन्क्युबेशन अँड स्टार्टअप सेलतर्फे करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. उद्घाटनानंतर उपस्थितांनी या उपक्रमाचे स्वागत करत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी हा उपक्रम निश्चितच उपयुक्त ठरेल, असा विश्वास व्यक्त केला.

# पंचशील विद्यालयात राजर्षी शाहू महाराज जयंती साजरी



हदगाव/प्रतिनिधी-शहरातील पंचशील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.संस्थेचे सचिव सुनील सोनूले, मुख्याध्यापक अनिल दस्तूरकर यांनी छत्रपती शाहू महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले.

याप्रसंगी बोलताना जेष्ठ शिक्षक जनार्धन देशमुख म्हणाले की, सामाजिक समतेसाठी कार्य करत जातीभेद,अस्पृश्यता आणि अन्यायाविरुद्ध ठाम भूमिका घेतली. शाहू महाराजांनी शेतकरी, कामगार आणि दुर्बल घटकांच्या हितासाठी अनेक लोककल्याणकारी धोरणे राबवली. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सह अनेक समाजसुधारकांना त्यांनी प्रोत्साहन व पाठिंबा दिला. यामुळे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांना सामाजिक न्यायाचे प्रणेते आणि लोकराजा म्हणून ओळखले जाते असे सांगून देशमुख यांनी छत्रपती शाहू महाराजांच्या कार्याला उजाळा देवून अभिवादन केले, याप्रसंगी पर्यवेक्षक श्री.जाधव, बेळकुंदे परीक्षा प्रमुख ओमकार मुधोळ सह शाळेतील शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# पोलीसांमुळे मुंबईत वाचले हजारो लोकांचे जीव

## मिरवणुकीत उंदराचे औषध वाटणाऱ्याला अटक

मुंबई/प्रतिनिधी-मुंबई पोलिसांनी शुक्रवारी हजारो मुंबईकरांचे जीव वाचवले असल्याची मोठी माहिती समोर आली आहे. मोहरमच्या मिरवणुकीत सहभागी झालेल्या नागरिकांना पेन किलर गोळ्या असल्याचे सांगून चक्क झिंक फॉस्फाईटच्या गोळ्या वाटलेल्या व्यक्तीला पोलिसांनी अटक केली आहे. सुदैवाने काही लोकांना त्रास झाल्यानंतर पोलिसांना याची माहिती मिळाली आणि भायखळा पोलिसांनी तांत्रिक माहितीच्या आधारावर ३९ वर्षीय आरोपीला अटक केली आहे. मुंबई पोलीस उपायुक्त जयंती मीना यांनी या प्रकरणाची माहिती देताना सांगितले की, मोहरमच्या मिरवणुकीत एक संशयित तरूण दिसला होता. चौकशीअंती तो परवानगीशिवाय कॅप्सूल विकत असल्याचे निष्पन्न झाले. पहाटे ४ वाजता एका व्यक्तीला उलट्या आणि पोटदुखीचा त्रास होत असल्याची माहिती आम्हाला मिळाली. त्यानंतर पोलीस पथकाने संशयिताला ताब्यात घेतले. मोहरमच्या मिरवणुकीला टार्गेट करण्यासाठी या तरुणाने हे कृत्य केल्याचे त्याने चौकशीत सांगितले.

# पैनगंगा नदीतील पाण्याची पातळी घटली;पाणी जपून वापरण्याचे नगरपंचायतीचे आवाहन

माहूर/प्रतिनिधी- पैंनगंगा नदीतील पाण्याची पातळी घटल्याने माहूर शहराच्या पाणीपुरवठ्यावर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. मात्र नागरिकांना नियमित पाणीपुरवठा सुरू राहावा यासाठी नगरपंचायत प्रशासन सर्वतोपरी प्रयत्न करत असल्याची माहिती नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांनी दिली.

माहूर शहराची पाणीपुरवठा योजना धानोडा येथील पैंनगंगा नदीपात्रावरील जलस्रोतावर अवलंबून आहे. यंदा पावसाने ओढ दिल्याने नदीतील पाण्याची पातळी लक्षणीयरीत्या घटली असून प्रशासनासमोर पाणीपुरवठ्याचे आव्हान उभे राहिले आहे.या पार्श्वभूमीवर नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांनी जलसंपदा विभागाचे अधिकारी कँकावार यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा केली. आज (शुक्रवारी) रात्री किंवा उद्या (शनिवारी) दिघडी बंधाऱ्यातून पाणी सोडण्यात येणार असल्याची माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी दिली. त्यामुळे नदीतील पाण्याची पातळी वाढून शहराचा पाणीपुरवठा पूर्ववत होण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांनी शुक्रवारी शहराच्या पाणीपुरवठा विहिरीची प्रत्यक्ष पाहणी करून यंत्रणेचा आढावा घेतला. यावेळी कार्यालयीन अधीक्षक गजलवाड, विजय शिंदे व शंकर दमलवार उपस्थित होते. पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक उपाययोजनांच्या सूचना यावेळी संबंधितांना देण्यात आल्या.यावेळी नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांनी नागरिकांना पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन केले. अनावश्यक पाण्याचा अपव्यय टाळून नगरपंचायतीला सहकार्य करावे, असे सांगत प्रशासन शहराचा पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच नागरिकांनी संयम राखून पाण्याचा जपून वापर करावा, असेही त्यांनी आवाहन केले.





नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या सदाशिवराव पाटील क्रीडा संकुलातील नव्याने होणाऱ्या क्रिकेट मैदानाची पाहणी करतांना स्वारातीम विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरु प्रा.डॉ.अशोक महाजन, नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सीए डॉ.प्रवीण पाटील, उपाध्यक्ष प्रफुल अग्रवाल सर, सहसचिव प्रदीप नागापूरकर, प्राचार्य डॉ.एल.पी.शिंदे, डॉ.डी.यु.गवई, सावने सर, संस्थेचे इतर दिसत आहेत. (छाया : शिवदास निळकंठे)

# स्वातंत्र्य सैनिकांचा इतिहास जतन करणाऱ्या नांदेडच्या कविता जोशी यांचा राष्ट्रीय पातळीवर गौरव

नांदेड/प्रतिनिधी-भारत सरकारच्या डिजिटल डिस्ट्रिक्ट रिपॉझिटरी प्रकल्पांतर्गत स्वातंत्र्यलढा आणि हैदराबाद मुक्तीसंग्रामाचा इतिहास जतन करण्यासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल नांदेड जिल्ह्याच्या डीडीआर प्रकल्पाच्या ब्रँड ॲम्बेसेडर तथा महात्मा फुले हायस्कूल, बाबानगर येथील शिक्षिका कविता जोशी यांचा नवी दिल्ली येथे केंद्र सरकारच्या वतीने राष्ट्रीय स्तरावर गौरव करण्यात आला.




केंद्रीय संस्कृति मंत्रालयाच्या अखत्यारीतील सांस्कृतिक स्रोत एवं प्रशिक्षण केंद्र, नवी दिल्ली येथे २५ जून रोजी आयोजित सन्मान समारंभात इंदिरा गांधी राष्ट्रीय कला केंद्राचे अध्यक्ष राम बहादुर राय यांच्या हस्ते कविता जोशी यांना मानचिन्ह, सन्मानपत्र आणि राष्ट्रीय सन्मान प्रदान करण्यात आला. यावेळी केंद्रीय सांस्कृतिक कार्य मंत्री गजेंद्र सिंह शेखावत, सीसीआरटीचे अध्यक्ष डॉ. विनोद नारायण इंदुरकर, संस्कृति मंत्रालयाचे संयुक्त सचिव समर नंदा व कमलेश कुमार मिश्र, निदेशक राजीव कुमार, सीसीआरटीचे संचालक पप्पूंजय कुमार तसेच उपसंचालक डॉ. राहुल कुमार उपस्थित होते.कविता जोशी यांनी नांदेड, हिंगोली, परभणी, बीड, लातूर आणि छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यांतील १५० हून अधिक स्वातंत्र्यसैनिकांच्या जीवनकथा केंद्र सरकारच्या पोर्टलवर सादर केल्या. त्यापैकी १३० हून अधिक कथा पोर्टलवर प्रकाशित झाल्या असून त्यांचे विविध भारतीय भाषांमध्ये भाषांतरही करण्यात आले आहे.या कार्यासाठी त्यांनी स्वातंत्र्यसैनिकांच्या कुटुंबीयांना प्रत्यक्ष भेटी देऊन ऐतिहासिक माहिती, दुर्मीळ कागदपत्रे आणि पुरावे संकलित केले. तसेच हैदराबाद मुक्तीसंग्रामातील अज्ञात नायक, महत्त्वपूर्ण घटना आणि ऐतिहासिक स्थळांचे दस्तऐवजीकरण करून इतिहास जतन करण्याचे मोलाचे कार्य केले.कविता जोशी यांच्या या राष्ट्रीय सन्मानामुळे नांदेड जिल्ह्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून, त्यांच्या या ऐतिहासिक कार्याचे विविध स्तरांतून अभिनंदन व कौतुक होत आहे.

# देगलूर शहरात स्वच्छतेसाठी मुख्याधिकारी व नगराध्यक्षांनी हाती घेतले टोपले,फावडे

देगलूर/प्रतिनिधी- नगरपरिषदेच्या वतीने मुख्याधिकारी श्रीमती नीलम कांबळे यांच्या संकल्पनेतून दर आठवड्याला एक दिवस श्रमदान या अभिनव उपक्रमाचा आज शुभारंभ करण्यात आला देगलूर शहर स्वच्छ व सुंदर बनविण्यासाठी हा उपक्रम हाती घेण्याचा आहे.

पहिल्या स्वच्छता अभियानाची सुरुवात नगर परिषदेच्या प्रांगणात स्वच्छतेची सामूहिक शपथ घेऊन झाली. त्यानंतर शहरातील सर्वाधिक कचरा साचलेल्या जिल्हा परिषद हायस्कूलच्या प्रांगणात प्रत्यक्ष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.या अभियानात नगरसेविका सौ.उज्वलाताई लक्ष्मीकांत पदमवार, सौ. योगेश्वरी लक्ष्मण तोटावार, सौ. पल्लवी रुपेश ध्याडे, स्वच्छता समिती सभापती रत्नमाला रमेश कोरवार, तसेच कलावतीबाई माधवराव मोरे, यांनी सक्रिय पुढाकार घेतला. आयसीआयसीआय बँकेच्या कर्मचाऱ्यांनी व नगरपरिषदेच्या सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांनी श्रमदान करून हातभार लावला. मुख्याधिकारी श्रीमती कांबळे यांनी सांगितले की, देगलूर शहर स्वच्छ ठेवणे ही फक्त नगरपरिषदेची जबाबदारी नाही, तर प्रत्येक नागरिकांची आहे. दर आठवड्याला एक दिवस श्रमदान करून आपण आपले शहर सुंदर करू असे आवाहन केले.या अभियानाचे विशेष आकर्षण ठरल्या नगराध्यक्ष सौ. विजयमाला बालाजीराव टेकाळे आणि मुख्याधिकारी श्रीमती नीलम कांबळे. शहरातील घाण स्वच्छ करण्यासाठी त्यांनी कसलाही संकोच न करता स्वतः; टोपले-फावडे हातात घेतले. हाताने कचरा उचलून घंटागाडीत टाकत त्यांनी सर्वात समोर आदर्श निर्माण केला. त्यांच्या या कृतीचे नागरिकाकडून मोठे कौतुक होत आहे.

# लोकशाहीच्या रक्षणासाठी तुरुंगवास भोगला; आणीबाणीचा इतिहास विद्यार्थ्यांसमोर उलगडला-केंद्रे

कंधार/प्रतिनिधी-देशात लागू करण्यात आलेल्या आणीबाणीच्या ५१ व्या स्मृतिदिनानिमित्त शेकापूर येथील महात्मा फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आणीबाणीच्या निषेधार्थ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी सत्याग्रही तथा माजी जिल्हा परिषद सदस्य संभाजीराव पाटील केंद्रे यांचा संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमात बोलताना संभाजीराव पाटील केंद्रे यांनी २५ जून १९७५ रोजी देशात लागू करण्यात आलेल्या आणीबाणीच्या काळातील अनुभव कथन केले. लोकशाहीच्या रक्षणासाठी आम्ही तुरुंगवास भोगला. अभिव्यक्ती स्वातंत्र्य, लोकशाही मूल्ये आणि संविधानाचे संरक्षण करण्यासाठी अनेक कार्यकर्त्यांनी संघर्ष केला, असे त्यांनी सांगितले.यावेळी आणीबाणीच्या काळातील घडामोडी, विरोधी पक्षांच्या नेत्यांवरील कारवाई, तसेच कंधार तालुक्यातील लोकशाही रक्षणासाठी झालेल्या आंदोलनाचा आढावा घेण्यात आला. त्या काळात कंधार पंचायत समितीने आणीबाणीविरोधात ठराव मंजूर करून लोकशाहीची बाजू घेतल्याची ऐतिहासिक आठवणही यावेळी सांगण्यात आली.कार्यक्रमात संस्थेचे सचिव तथा चेअरमन शिवाजीराव पाटील केंद्रे, प्राचार्या सौ. रेखाताई गित्ते, पर्यवेक्षक अमित लोंड सर यांच्या हस्ते संभाजीराव पाटील केंद्रे यांचा शाल, पुष्पहार व श्रीफळ आणि वट वृक्षाचे झाड देऊन गौरव करण्यात आला.या प्रसंगी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी उपस्थित राहून लोकशाहीचे महत्त्व आणि संविधानिक मूल्यांचे जतन करण्याचा संकल्प व्यक्त केला.सुत्रसंचलन चंद्रकांत पडलवार सर यांनी केले तर आभार मोहित केंद्रे सर यांनी मांडले.

# बाऱ्हाळी ते बिहारीपूर राष्ट्रीय महामार्गाच्या दर्जावर प्रश्नचिन्ह



## अवघ्या चार वर्षांतच रस्त्याला पडली भगदाडे!

मुखेड/प्रतिनिधी-मुखेड तालुक्यातील विकासकामांच्या दर्जाचे विदारक वास्तव बा-हाळी ते बिहारीपूर राष्ट्रीय महामार्ग क्र. १६१ (अ) च्या रूपाने समोर आले आहे. कँत्राटदार आणि संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांच्या संगनमतामुळे कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च होऊनही, अवघ्या चार वर्षांतच या सिमेंट रस्त्याची चाळण झाली आहे. रस्त्याला पडलेल्या मोठ्या भेगा आणि धोकादायक पुलांमुळे हा मार्ग मृत्यूचा सापळा बनला असून, या संपूर्ण कामाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे.

बा-हाळी, वडगाव ते बिहारीपूर या राष्ट्रीय महामार्गासाठी मंजूर झालेला कोट्यवधी रुपयांचा निधी निकृष्ट दर्जाच्या कामामुळे अक्षरशः पाण्यात गेला आहे. स्थानिक नागरिकांच्या आरोपानुसार, कँत्राटदाराने कामात प्रचंड भ्रष्टाचार केला असून, अंदाजपत्रकातील निकषांना हरताळ फासली आहे. सिमेंटचा दर्जा, थर आणि कॉंक्रीटीकरण करताना नियमांचे पालन न केल्याने रस्त्यावर जागोजागी भेगा पडल्या आहेत. विशेष म्हणजे, रस्ता पूर्ण झाल्यानंतर अवघ्या काही महिन्यांतच पावसाळ्यात पाणी साचणे आणि सिमेंटचे थर उखडणे यांसारखे प्रकार समोर आले होते.या महामार्गावरील दोन पुलांची अवस्था अत्यंत धोकादायक झाली असून, यामुळे सातत्याने गंभीर अपघात होत आहेत. या अपघातांमध्ये अनेकांना आपला जीव गमवावा लागला आहे, तरीही सार्वजनिक बांधकाम उपविभाग, मुखेडचे अधिकारी याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप होत आहे. कँत्राटदाराने निकृष्ट काम केले असतानाही त्याला 'क्लिन चिट' देणाऱ्या अधिकाऱ्यांच्या भूमिकेबद्दल संशय व्यक्त केला जात आहे.हा रस्ता परिसरातील शेकडो शेतकरी, शालेय विद्यार्थी आणि प्रवाशांसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. मात्र, सध्याची रस्त्याची दुरवस्था पाहता, ही जनतेची मोठी फसवणूक असल्याचे मत ग्रामस्थ व्यक्त करत आहेत.

# शेतकरी कर्जमाफीच्या आंदोलनात सहभाग नोंदवा-आ. रोहित पवार

नांदेड/प्रतिनिधी-राज्य सरकारने शेतकऱ्यांना जाहीर केलेली कर्जमाफी अनेक नियम लाऊन केवळ कर्जमाफीचा फार्स चालवला आहे. सरकारने विनाअट सरसकट कर्जमाफी करावी या मागणीसाठी एल्गार अन्नत्याग आंदोलन दि. २९ जून रोजी सकाळी १०.३० वाजता छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित केले आहे. या आंदोलनात सर्वांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आ. रोहित पवार यांनी केले आहे.

पंढरपूर येथे शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी आंदोलन केल्यानंतर आणि राज्य सरकारने याकडे योग्य पद्धतीने लक्ष दिले नसल्याने आ. रोहित पवार यांनी पुन्हा एकदा शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी अन्नत्याग आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे. त्यानिमित्त ते मराठवाड्याच्या दौर्यावर असून दि. २५ जून रोजी सायंकाळी त्यांनी पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी हे आवाहन केले. राज्य सरकार विविध अटी टाकून शेतकऱ्यांचे कर्ज माफ करत नाही. सरकारच्या या धोरणामुळे ३६ लाख शेतकऱ्यांवर अन्याय होणार आहे. त्यामुळे कुठलाही पक्ष नसला तरी पक्षविरहित हे आंदोलन शेतकऱ्यांच्या न्याय मागणीसाठी हे आंदोलन करीत आहोत. सर्वांनी यात सहभाग नोंदवावा असे आवाहन त्यांनी केले.

# सार्वजनिक मोहरम उत्सव उत्साहात साजरा

कंधार/प्रतिनिधी-कंधार तालुक्यातील बारुळ येथे सार्वजनिक मोहरम ताजिया उत्सव यावर्षी अत्यंत उत्साहपूर्ण, शांततामय आणि भक्तीमय वातावरणात मोठ्या श्रद्धेने संपन्न झाला. जुनी ग्रामपंचायत कार्यालय ते श्री महादेव मंदिर या मार्गावर काढण्यात आलेल्या भव्य ताजिया मिरवणुकीत गावातील सर्व समाजबांधव, युवक, ज्येष्ठ नागरिक तसेच मान्यवरांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून सामाजिक ऐक्य, बंधुता आणि सर्वधर्मसमभावाचे प्रेरणादायी दर्शन घडवले.

यावेळी पुसद येथून विशेषतः आणण्यात आलेली पारंपरिक हलगी मिरवणुकीचे मुख्य आकर्षण ठरली. हलगीच्या दमदार तालावर युवकांनी उत्साहाने सहभाग घेतला असून उपस्थित नागरिकांनीही तिचे विशेष कौतुक केले. संपूर्ण मिरवणूक शांततामय वातावरणात पार पडल्याने गावातील सामाजिक सलोखा अधिक दृढ झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.उत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहकार्य करणाऱ्या सर्व ग्रामस्थांचे सार्वजनिक मोहरम कमिटी, बारुळ यांच्या वतीने मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले. भविष्यातही अशाच विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक उपक्रमांच्या माध्यमातून गावातील एकोपा व बंधुभाव अधिक मजबूत करण्यासाठी प्रयत्न सुरू राहतील, असा विश्वास बबलू शेख बारुळकर आणि शाहरुख पठाण यांनी व्यक्त केला.याप्रसंगी माजी सरपंच शंकरराव नाईक, माजी सरपंच अनिल सावकार कुंभारे, माजी उपसरपंच जयराम कांबळे, उदय पाटील जाधव, नारायण सावकार कुंभारे,बालासाहेब पाटील जाधव,संजय पाटील जाधव पोलिस पाटील,चांद खान पठाण, तौसिफ शेख, बाळू कोल्हे, जिलानी शेख, माधव गालशेटवार, बाळू सुरुमवाड मिस्त्री, ओम ठाकूर, तुळशीराम वाघमारे, आजम शेख, रशीद शेख, सत्तार शेख, महेबुब शेख, सरवर शेख, रसूल पठाण, रसूल शेख यांच्यासह गावातील अनेक नागरिक उपस्थित होते.

# गोविंद रोयलावार यांच्या निधन

देगलूर/प्रतिनिधी- शहरातील शारदानगरमधील रहिवासी तथा व्यावसायिक गोविंद गंगाराम रोयलावार यांचे अल्पशा आजाराने दि.२६ जून रोजी दुपारी ३ वाजता खाजगी रुग्णालयात उपचारादरम्यान निधन झाले. ते ५४ वर्षाचे होते. त्यांच्या पार्थिवावर शहरातील सार्वजनिक वैकुंठधाम येथे दि.२७ जून रोजी दुपारी अंत्यसंस्कार करण्यात आले.

पान १ वरुन

## वर्षभरापासून उद्घाटनाच्या...

उभारलेली इमारत वर्षभर वापराविना पडून राहिल्याने संताप व्यक्त केला जात आहे.कुंडलवाडी हे व्यापारी व शैक्षणिकदृष्ट्या महत्त्वाचे केंद्र असल्याने दररोज मोठ्या संख्येने प्रवाशांची ये-जा होत असते. अशा परिस्थितीत आधुनिक बसस्थानक तातडीने सुरू करणे ही काळाची गरज असल्याचे नागरिकांचे मत आहे. स्थानिक लोकप्रतिनिधींनी संबंधित प्रशासनाकडे पाठपुरावा करून नवीन बसस्थानकाचे उद्घाटन लवकरात लवकर करावे आणि ते प्रवाशांच्या सेवेत दाखल करावे, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४